# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

**Price Rs. 3/-**

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*

*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

**Vol.-2** **Issue - 13** जुलै २०१० **July 2010**


## संपादकीय

सभासद मित्रांनो,

बघता बघता २०१० वर्षाचे सहा महिने उलटून गेले. मे महिन्यातील आमरसाची चव अजून जीभेवर रेंगाळते आहे. एप्रिल, मे महिन्याची सुट्टी संपून जूनमध्ये नातवंडाच्या शालेय जीवनातील नवीन पर्व सुरू झाले. बळीराजा पावसाचा वेध घेतो तो जूनमध्येच. जुलै महिन्यातील ज्ञानोबा ज्ञानेश्वर माऊलींच्या, पंढरपूरक्षेत्री विठुरायाचे दर्शनानिमित्त निघणाऱ्या पालख्यांचे वेध जून पासूनच भक्त मंडळींना लागलेले असतात. या समस्त भक्त मंडळींना कोणतेच, कुणाचेही वारीसाठी निमंत्रण नसते. ठराविक वेळी उत्सफूर्तपणे काही भक्तगण या वारीत सामील होतात. पांडुरंग दर्शन हीच एक आस उराशी बाळगून घरातील चिंता, काळज्या, अडचणी विसरून, वारीच्या वाटेत येणाऱ्या पाऊस, वारा प्रकृतिसंबंधी समस्यांशी सामना करीत आनंदाने वारीची वाटचाल ते करत असतात.

आपले जीवन, आयुष्य ही एक वारीच आहे. कोणत्या वेळी या जीवनप्रवाहाला कोणतं वळण मिळेल हे कोणी सांगू शकणार नाही. चमत्कृतीतच या जीवनाचे सौंदर्य साठवलेलं आहे. कोणत्यातरी नियमाप्रमाणं माणसाचं आयुष्य घडत असतं तर ते सुंदर वाटलं नसतं. प्रत्येक क्षण बेभरवशाचा आहे. चंचल आहे. म्हणूनच या आयुष्यात खिळवून टाकणारी जबरदस्त शक्ती आहे. मरत्या क्षणीसुद्धा आयुष्याला बिलगण्याचा प्रयत्न माणूस करतो.

काही अरसिक, काही निराश, विरक्त मंडळींना जीवन ही कंटाळा आणणारी गोष्ट आहे असे वाटते. एकाच चाकोरीतून मरण येईपर्यंत चालत राहायचं यापेक्षा जीवनात अधिक काय असतं ? ''लालसर पानांनी हिरवं व्हायचं. हिरव्यांनी पिवळं व्हायचं आणि पिवळ्यांनी गळून पडायचं'' ही त्यांची धारणा. सुंदरतेची ग्रहण करण्याची संवेदना बोथट झाली की माणसाला सुरूपतेच्या जागी कुरूपता दिसू लागते. जरा दृष्टीत फरक केला की या चाकोरीबद्ध जीवनातसुद्धा आनंदाचे क्षण विखुरलेले असतात हे लक्षात येईल. प्रतिवर्षी येणारा पाऊस नव्या आनंदाच्या धारा घेऊन येतो. केवळ पाऊस पाहण्यासाठी आणि तो अंगावर घेण्यासाठी कितीतरी लोक खंडाळा, लोणावळा, महाबळेश्वर येथे मुद्दाम जातात. प्रत्येक पावसाळ्यातील पाणी नवीन असतं. पावसाचे थेंब प्रतिवर्षी अंगावर घेणारी धरित्री नवीन असते. आकाशातील काळे मेघ नवीन असतात. नाविन्याची अनुभूती घेणाऱ्याला आपलं आयुष्य चाकोरीसारखं एकसूरी वाटणार नाही. प्रत्येक दिवशीच्या सूर्यकिरणातली जादू अजून ओसरलेली नाही. सूर्योदय आणि सूर्यास्त दर्शनाचाही आनंद लुटण्यासाठी लोक अजूनही गर्दी करतातच की ! आयुष्याला शिळेपणाचा वास कधीच येत नाही. ते सुखाचं असेल की दु:खाचं असेल, पण दु:खालाही नवीनपणा असतो. सुखदु:खांचे अनंत रंगबेरंगी प्रकार आहेत. म्हणून तर दु:खी माणसालाही या जीवनाची संगत सोडवत नाही.

**- प्रभाकर गुपचूप**

### वार्षिक सर्वसाधारण सभा २०१०

आपल्या स्टेट बँक ऑफ इंडिया असो.ची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १२ जुलै २०१० रोजी सोनल हॉल, कर्वे रोड, पुणे येथे दुपारी १२ ते ५ या वेळात संपन्न झाली. या सभेस संपूर्ण महाराष्ट्र व गोवा येथून सुमारे ८५० प्रतिनिधी, सभासद उपस्थित होते.

सभेचा सविस्तर वृत्तांत 'संवाद' च्या अंकात लवकरच प्रसिद्ध केला जाईल.

\- सेक्रेटरी

## State Bank of India Pensioners' Association, Ahmedabad Circle

Office : C/o Mr. Rajendra N. Dave, Gen. Secretary
5/54, Parishram Apartment, Behind Bimanagar, 132 Ring Road, Satelite,Ahmedabad - 380015

SBI/PEN.ASSOC/ Date : 10-06-2010

Respected Shri. Dandekarji &
Dear Shri. Gokhale,

Your Circle Association monthly magazine issue of may 2010 "Samvad" is in hand. I am very happy particularly to read two informations about activities which you have under taken.

i) Opening of Holiday Home at Panaji (GOA) is really praiseworthy. You and your team of office bearers deserve all compliments. Yours is a path breaking step. Among the Pensioners Movement your circle is first in many matters, which other circle association can emulate for the benefit of their members.

ii) Meeting of the retired senior executives of the Bank, this is also a step in the right direction. It is necessary that Retired Senior 'Executives' take more interest in improving the lot of pensioners and contribute more to strengthen the organization financially and in all other areas.

Your successful meeting of senior executives is a good beginning and other bigger circles where large number of retired executives have settled, also should convene such meeting.

Once again congratulating you for your initiative in right direction.

With greetings and best wishes.

Yours sincerely,
Sd/-
Suresh Rindani
President

### For Information Of All Members

### Portal For IBI/SBI Pensioners : www.sbihrms.com

**On the occasion of Bank Day, 1st July' 2010, it gives us immense pleasure in announcing that HRMS portal (www.sbihrms.com) is now available for IBI/SBI Pensioners/ Family pensioners.**

**Details of login & password can be obtained from Branches.**

**Branch heads are advised to login HRMS support sites http:// 10.0224.59 or http:// 10.0.224.16 for User-id and default password.**

**- Secretary**

### महत्त्वाचे निवेदन

आपल्या बँकेचे पुणे-ईस्ट स्ट्रीट वरील झोनल/रिजनल/ Administrative Office शंकरशेट रोडवर स्थलांतरीत झालेले आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी. त्याचा नवीन पत्ता खालीलप्रमाणे-

STATE BANK OF INDIA
Adminstrative Office
Sharda Chambers, 7/8th Floor,
386/2, Shankar Sheth Road, Pune - 411 037
Tel. Personnal Dept. - 26404771, 26404772
Dr.Mrs.Rawat - 26404854

**Mumbai Head Office**

STATE BANK OF INDIA, L.H.O.
Synergy Bldg.,
'G' Block, Plot No. C-6,
Bandra Kurla Complex,
Bandra East, Mumbai - 400050
P.M. PPG : 022-67514318, 67514326

**- Secretary**

**Important - For Information of Members**

# STATE BANK OF INDIA
# RETIRED EMPLOYEES' MEDICAL BENEFIT TRUST
# CLAIM FOR REIMBURSEMENT OF DOMICILIARY TREATMENT

| | | |
|---|---|---|
| 01 | Name of the employee (member pensioner) | |
| 02 | Date of Retirement<br>Membership Number | |
| 03 | Whether claimed for self/spouse | |
| 04 | Address & Telephone No. | |
| 05 | Retired As | |
| 06 | Pension Paying Branch SB A/C No. | |
| 07 | Nature of illness | |
| 08 | Name of the dependent family member for whom the Medical Expenses made<br>Name -<br>Age -<br>Relationship - | |
| 08 | Duration of illness | |
| 09 | Name & address of the attending Physician | |
| 10 | Details of expenditure incurred & claim to be submitted alongwith Doctor's prescription--as per reverse | Total Amount |
| 11 | I certify that I have incurred above expenses for myself & / eligible family members | |

`

Signature of the pensioner
member

Forwarded for payment

Branch Manager
Branch _______________

# DETAILS OF THE BILLS

| BILLNO. | DATE | PARTICULARS OF THE BILL | AMOUNT | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| **TOTAL** | | | | |

Signature of the pensioner member

AT ADMINISTRATIVE OFFICE

Amount of the expenditure claimed for Domiciliary treatment Rs.

Amount of expenditure for Domiciliary treatment already claimed during the year Rs.

Balance available for domiciliary treatment Rs.

sanctioned Rs. Towards Domiciliary treatment

Chief Manager (HR) Assistant General Manager (ADMIN)

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल)

## पुणे झोनल सब सेंटर

# वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

पुणे झोनल सब सेंटरची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १४ मे २०१० रोजी एस.एम.जोशी सभागृह, गांजवे चौक, नवी पेठ, पुणे ३० येथे सायंकाळी ५.३० वाजता संपन्न झाली.

आपल्या सर्कल असोसिएशनचे पदाधिकारी सर्वस्वी लळिंगकर - जनरल सेक्रेटरी, भरत गुप्ते - जॉईंट जनरल सेक्रेटरी, एस.पी.बर्वे-ट्रेझरर हे आमंत्रित हजर होते.

त्याशिवाय पुणे झोनमधील जिल्हा प्रतिनिधी व एकूण २०० सभासद उपस्थित होते.

झोनल सेक्रेटरी श्री.चंद्रकांत कुलकर्णी यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नंतर गतवर्षातील दिवंगत सभासदांची नावे वाचून दाखविली. सर्व सभासदांनी दिवंगत सभासदांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली. नंतर श्री.कुलकर्णी यांनी गतवर्षी २२ एप्रिल २००९ रोजी झालेल्या वार्षिक सभेचा वृत्तांत जो संवाद मे २००९ च्या अंकात छापून आलेला होता, त्यास सभेची मंजुरी देण्याबाबत आवाहन केले. त्यास सर्व उपस्थित सभासदांनी मान्यता दिली.

श्री डीके यांनी गेल्या वर्षी त्यांना वयाची पंचाहत्तरी पूर्ण केल्यानिमित्ताने असोसिएशनने देऊ केलेला सत्कार स्विकारलेला नव्हता. त्याचा उल्लेख इतिवृत्तांत नाही असे सांगितले. श्री.कुलकर्णी यांनी त्याची आता नोंद घेतली जाईल असे सांगितले.

त्यानंतर श्री. कुलकर्णी यांनी मागील वर्षातील कामकाजाचा आढावा सादर केला. गतवर्षात एकूण २३४ नविन सभासद झाले व रुपये ४०१६८३/- इतकी रक्कम सभासद फी व देणगी स्वरूपात जमा झाली. याही वर्षी श्री.पुणेकर यांनी ६१ नविन सभासद नोंदवले. त्यांनी आत्तापर्यंत १३५० सभासद नोंदवून आपल्या झोनमध्ये उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. त्याबद्दल सर्व सभासदांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले.

झोनमधील सर्व जिल्ह्यांमधून वर्षभरात सभासदांसाठी अनेक कार्यक्रम करण्यात येतात. कामकाज बैठका, मान्यवरांची भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, तिळगुळ समारंभ, सहली, हेल्थ कॅम्पस् इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचा धावता आढावा त्यांनी घेतला. वेळोवेळी 'संवाद' मधून त्यांना प्रसिद्धीही देण्यात येते. विशेषत: सोलापूर येथील श्री.लावणीस यांच्या कार्याचा व पुणे येथे सभासदांसाठी हाडांची घनता मोजणीचा कँप घेण्यात आला. याचा त्यांनी गौरव केला.

पुणे शहरात अनेक दिवसापासून पेन्शनरांसाठी डायग्नोस्टिक सेंटर नाही. ही फॅसिलिटी सध्या बंद आहे. त्याबद्दल बऱ्याच तक्रारी आल्या आहेत. त्याचप्रमाणे पौड रोड येथील दवाखान्याचे प्रकरण दीड वर्षे बँकेकडे प्रलंबित आहे. तेथे दवाखाना अजून सुरू झाला नाही. त्याचप्रमाणे सोलापूर, सातारा, नगर येथील पण दवाखान्याची अजून सुरूवात नाही. या सर्व बाबतीत झोनल ऑफिस व स्थानिक प्रधान कार्यालयात पाठपुरावा चालू आहे व सी.डी.ओ. साहेबांची प्रत्यक्ष गाठ घेणार आहे असे श्री.कुलकर्णी यांनी सांगितले.

असोसिएशनच्या ऑफिसमध्ये असणाऱ्या वाचनालयास आता आठ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याची व्यवस्था पाहणारे सर्वश्री अशोक वाकचौरे, अरविंद काळे, सुभाष बेलसरे, राजेश वैद्य यांचे श्री.कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. याही वर्षी अनेक सभासदांनी आपल्या वैयक्तिक आयुष्यातील चांगल्या घटनांच्या निमित्ताने असोसिएशनला देणग्या दिल्या आहेत. त्यांचे कुलकर्णी यांनी आभार मानले. सांस्कृतिक व मनोरंजनाचा कार्यक्रम स्नेह मंडळाच्या माध्यमातून श्री. मधुकर सरदेशमुख यांनी चांगल्या प्रकारे चालवला आहे त्याचेही श्री. कुलकर्णी यांनी कौतुक केले.

सर्व सभासदांना वाढदिवसाच्या शुभेच्छा पाठवणारे श्री. माधव बापट व त्यांना मदतीला असणारे सर्वश्री जोशी व राजवाडे यांचे कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

दिनांक २२-०७-०९ रोजी झालेली सर्कल असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा नगरच्या सर्व सभासदांनी उत्तम रितीने पार पाडली ते सर्व अभिनंदनास पात्र ठरले.

कोल्हापूर येथील दवाखान्याचे बजेट रू. ५००००/- वाढवून मिळाले आहे. त्या युनिटचे सभासद डॉक्टरांना दवाखान्याच्या कामात मदत करतात. या वृत्ताचे सभासदांनी टाळ्यच्या गजरात स्वागत केले.

पुणे झोनल ऑफिसमधील सर्व अधिकारी वर्गाच्या सहकाऱ्याबद्दल त्या सर्वांचे कुलकर्णी यांनी आभार मानले.

यानंतर गेल्या वर्षभरात ज्या सभासदांनी ७५ वर्षे पूर्ण केली आहेत अशा खालील सभासदांचा सर्वश्री लळिंगकर व व्ही.पी.भावे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारार्थींची

नावे - सर्वश्री अरविंद विनायक कुलकर्णी, बाबुराव लक्ष्मण उगाले, गोविंद अदोनी, शामकांत पटवर्धन, एन.एस.कुलकर्णी व सौ.आशा एन.कुलकर्णी, पद्मचंद भंडारी, जे.डी.बोगा, पी.एस. अभ्यंकर व सौ.मंदाकिनी पी.अभ्यंकर, नानी एस.रिपोर्टर, प्रभाकर एन.जावखेडकर, एल.एन.देशमुख, कमलाकर जरिपटके, यु.सि.नाईक, रामराज के.तुळशिबागवाले, एन.एल.नाडकर्णी, एस.एस.देशपांडे (सातारा), मुकुंद शामराव वैद्य, (पंढरपूर), सौ.संध्या भालचंद्र गाडगीळ, फ्रेमी फिरोज कायस, श्रीमती शैलजा दत्तात्रय पुरंदरे, सौ.वसुधा वसंत कोतवाल

सत्कारार्थींतर्फे श्री.एन.एस.कुलकर्णी यांनी आपले मनोगत मांडले. त्याचप्रमाणे सत्कारार्थी सौ.कोतवाल यांनी त्या करत असलेल्या कार्याबद्दल माहिती सांगितली व असोसिएशनच्या कार्याचा गौरव केला.

(सत्कारानंतर श्रीयुत एस.पी.बर्वे यांनी ऋग्वेदातील आशीर्वादपर ऋचांचे पठण करून या सर्वांना दिर्घायुष्य लाभो अशी सर्वांतर्फे प्रार्थना केली.)

त्यानंतर असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी श्री.लळिंगकर यांनी असोसिएशन व बँक तसेच कोर्ट केसेसच्या सद्य स्थितीचा व इतर अनेक बाबींचा आढावा घेतला. तसेच सभासदांनी बँकेला लाईफ सर्टिफिकेट व इन्कम टॅक्सबाबत गुंतवणूकीची माहिती त्वरित द्यावी असे आवाहन केले.

यानंतर श्री.मधुकर सरदेशमुख निर्वाचन अधिकारी यांनी पुणे झोनल सब-सेंटरच्या २०१०-२०१२ च्या द्वैवार्षिक निवडणूकांचा निकाल जाहिर केला व खालील पदाधिकारी बिनविरोध निवडून आले असे जाहिर केले.

| | | |
|---|---|---|
| एल.जी.गांधी | - | अध्यक्ष |
| व्ही.एन.कुलकर्णी | - | उपाध्यक्ष |
| श्री.चंद्रकांत कुलकर्णी | - | सचिव |
| श्री.अशोक पंडित | - | सहसचिव |
| डी.ए.कुलकर्णी | - | खजिनदार |

**समिती सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.एम.एन.लेले | - | पुणे |
| २) | श्री.प्रमोद चाटे | - | पुणे |
| ३) | श्री.अविनाश देशपांडे | - | पुणे |
| ४) | श्री.पी.बी.कुलकर्णी | - | पुणे |
| ५) | श्री.गणेश गुर्जर | - | पुणे |
| ६) | श्री.अरूण के.इनामदार | - | पुणे |
| ७) | श्री.दत्तात्रय बेंद्रे | - | पदसिद्ध, सोलापूर |
| ८) | श्री.एस.एम.भणगे | - | - ‘‘ - नाशिक |
| ९) | श्री.एस.एस.देशपांडे | - | - ‘‘ - सातारा |
| १०) | श्री.एस.डी.करमरकर | - | - ‘‘ - सांगली |
| ११) | श्री.एस.आर.जोशी - | - | - ‘‘ - अहमदनगर |
| १२) | श्री.पी.सी.चित्रे | - | - ‘‘ - कोल्हापूर |

सर्व सभासदांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

मावळते अध्यक्ष श्री. विजय भावे यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष श्री.गांधी यांना सूत्रे दिली व सुयश चिंतिले. तसेच आपले मनोगतही व्यक्त केले.

सभासदांच्या शंका समाधानानंतर इतर काही विषय राहिलेला नसल्याने सभेची सांगता झाली. श्रीयुत व्ही.एन.कुलकर्णी यांनी आभार मानले व सभा संपल्याचे जाहीर केले. सभेचे सूत्र संचालन श्री.अशोक पंडित यांनी केले होते. सभेनंतर सभासदांच्या मनोरंजनासाठी स्नेहमंडळातर्फे आपल्याच बँकेतील एक कर्मचारी श्रीयुत राजेंद्र कुलकर्णी यांची बासरी व श्रीयुत मिलिंद तुळणकर यांचे जलतरंग यांचा जुगलबंदीचा कार्यक्रम सादर करण्यात आला. सर्व सभासद या कार्यक्रमात तल्लिन झाले होते. आपले सभासद श्रीयुत शामकांत पटवर्धन यांनी नाट्यगीत सादर केले.

मध्यंतरात उपस्थित सभासदांना चहापान व स्नॅक्सची पाकिटे देण्यात आली.

- चंद्रकांत कुलकर्णी, सचिव

# युनिट वार्ता

**अमळनेर युनिट :**

अमळनेर येथे संत सखाराम महाराज यांचे पुण्यतिथी निमित्ताने एक पालखी सोळा व रथोत्सव वैशाख महिन्यात आयोजित केला जातो, ह्या उत्सवाला अमळनेर मंत्रकोशीतील मोठा समुदाय हजर असतो. त्यानिमित्ताने अमळनेर युनिटने पर्यावरण जागृती व वृक्ष संवर्धन बाबत जन जागृती व्हावी ह्या उद्देशाने यात्रेकरुंना एक पत्रक छापून वितरीत करण्यात आले. सध्याचे महाराज प.पू.प्रसाद महाराज यांचे हस्ते ‘‘मानव वंश वाचवायचा आहे ना ? मग पर्यावरण वाचवा’’ ह्या शिर्षकाखाली हे पत्रक काढण्यात आले.

ह्यासाठी युनिट अध्यक्ष श्री.केदार ब्रह्मे त्यांचे सहकारी सर्वस्वी पिंपळीकर, चंद्रात्रे, अनंत कुलकर्णी, विलास ब्रह्मे , चित्ते इत्यादींनी अत्यंत परिश्रम घेतले. युनिट करीत असलेल्या समाज कार्याला असोसिएशनतर्फे शुभेच्छा.

- सेक्रेटरी

## २० जुलै- २०१० प्रथम स्मृतिदिनानिमित्त
## भास्करराव गद्रे - एक थोर व्यक्तिमत्त्व

मला वाटतं १९ डिसेंबर १९६१ साली गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यातून मुक्त झाला. Banko National Ultimarino ही तिथली सरकारी बँक आपण म्हणजे स्टेट बँकेने चालवावयाला घेतली. पणजी ही गोव्याची राजधानी. सर्व सरकारी कचेऱ्या, मुख्य पोलिस कार्यालय, रेडिओ-केंद्र, मोठमोठाली हॉटेल्स, उद्योगधंदे हे पणजीलाच. आपली पणजी ब्रँच ३ जानेवारी १९६२ ला सुरू झाली मी वेंगुर्ल्याहून बदली होऊन १० जाने. ६२ ला पणजी ब्रँचला कॅशिअर म्हणून दाखल झालो.

आमचे पहिले ब्रँच मॅनेजर म्हणून श्री.इराणी साहेब आले. रुबाबदार व्यक्मिमत्त्व भरदार मिशा, खणखणीत आवाज ! आम्हाला नेहमी म्हणायचे, ''तुम्हाला भारत सरकारने या Foreign country मध्ये कशाला पाठविले आहे. काम करण्यासाठी! खूप काम करत जा !''

सुरूवातीला आमचं कॅशिअर लोकांचं काम म्हणजे लोकांच्या पोर्तुगीज नोटा घेऊन त्याबद्दल भारतीय नोटा - Rupee currency त्यांना देणे. रिझर्व्ह बँकेने ह्या कामासाठी ६ महिन्यांची मुदत दिली होती. सुरूवातीला ह्या नोटा बदलून घेण्यासाठी बँकेत भयंकर गर्दी व्हायची. सहा Escudo म्हणजे आपला भारतीय एक रूपया असा Exchange Rate होता बरं पोर्तुगीज नोटा ह्या १००/- Escudo ६००/-, १००/-, ५०/-, १०/- अशा किंमतीच्या १०००/- शिर्लीवे म्हणजे भारतीय १६६.६६ पैसे असे विचित्र Exchange खूप काम असायचं ! कधी कधी आम्ही रात्री बँकेतच झोपायचो.

श्री.इराणीसाहेब थोड्या दिवसानंतर बदलून गेले आणि त्यांचे जागी श्री.भास्करकराव गद्रेसाहेब आले. मराठी माणूस आणि मुख्य म्हणजे पुण्याचे ! आम्हाला बाहेरून गेलेल्या लोकांत खूप बरे वाटले. सुरूवातीला श्री.गद्रे साहेबांना custodian आणि ब्रँच मॅनेजर अशी दोन्ही कामे करावी लागत. त्यांनी थोड्याच काळात आपले बस्तान- अंगच्या हुशारीमुळे व्यवस्थित बसविले. असं सांगतात की, Foreign Exchange विभागात ते Letter of credit कस्टमर बघून without margin उघडत. खूप मोठा धोका त्यात असे. परंतु धोका पत्करून त्यांनी बँकेचा उद्योग खूप वाढविला. पोर्तुगीज बँकेकडून आपण बँक घेतली तेव्हा खूप problems होते. पोर्तुगीज सरकारने लोकांनी त्यांच्या बँकेत ठेवलेले सर्व सोने नाणे आपल्याबरोबर नेले. बँकेत त्यावेळी जेवढ्या पोर्तुगीज नोटा currenc होती ती रस्त्यावर नेऊन, ट्रकमधून नेऊन जाळून टाकली. कशासाठी तर भारत सरकारला संपत्ति मिळू नये म्हणून ! कितीतरी problems परंतु श्री.गद्रेसाहेबांनी त्या सर्वांना विश्वासपूर्वक तोंड दिले.

आमच्या दृष्टीने - स्टाफच्या दृष्टीने एक मोठी कामगिरी श्री.गद्रेसाहेबांनी करून दाखवली. गोव्यात त्यावेळी खूप महागाई होती. सर्व वस्तू महाग ! त्यांना हे सर्व जाणवत होते. त्यांनी विचारपूर्वक एक निर्णय घेतला. ऑफिसरांना १५०/- रू. क्लार्क-कॅशिअर यांना ९०/- रू. तर शिपाई लोकांना ६०/- रू. असा Special Goa Allowance (दर महिन्याला) त्यांच्या अखत्यारीत त्यांनी मंजूर केला आणि त्याचं payment लगेच आम्हाला दिले. खरं म्हणजे H.O. च्या संमतिशिवाय या पैशाच्या गोष्टी करता येत नाहीत. परंतु श्री. गद्रेसाहेबांनी स्वत:च्या हिंमतीवर आम्हाला पैसे दिले आणि नंतर ते मुंबईला H.O. मध्ये गेले आणि हा special Goa Allowance sanction करून आणला.

श्री. गद्रेसाहेब अगदी साधे रहात. पांढरी पँट, पांढरा शर्ट, टाय आणि कोट ! नेहमी हसतमुख ! तिथल्या ख्रिश्चन मुलांसाठी ते भगवद् गीतेचे वर्ग घेत. असं म्हणतात की, त्यांना कामाचा खूप अनुभव confidence होता. पहिले Audit झाले तेव्हा Audit Report आणि त्याचे Explanation एकाच वेळी H.O. पोचले. एका दिवसात रात्रभर बसून ते टाईप करून घेऊन त्यांनी Audit Report बरोबरच ते पाठवून दिले.

आता एकच गोष्ट सांगून हा लेख पुरा करतो. श्री.गद्रेसाहेब दुपारी २.३० ला पणजीला पोस्ट-ऑफिसच्या मागे-भटाची खानावळ होती, तिथे जेवायला जायचे ! आम्ही म्हणजे मी आणि श्री.भालचंद्र कुलकर्णी, कॅशिअर त्याच ठिकाणी जेवायला जायचो. श्री.गद्रेसाहेबांनी हे बघितलं आणि दुपारी अडीच वाजता आमची वाट बघत ते थांबायचे आणि त्यांच्या गाडीतून आम्हाला भटाच्या खानावळीत न्यायचे ! कुठे पणजीसारख्या स्टेट बँकेचा एक मोठा ब्रँच-मॅनेजर आणि कुठे आम्ही साधे कॅशिअर !

पुण्यात रामकृष्ण मठाचे जेव्हा मंदिर होणार होते तेव्हा मी त्यांच्या घरी गेलो होतो वर्गणीसाठी ! आणि त्यांनीही आनंदाने मला प्रणामी-वर्गणी दिली होती ! त्यांच्याबद्दल खूप सांगण्यासारख्या गोष्टी आहेत. परंतु लेखन-मर्यादिस्तव इथेच थांबतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो !

**- र.भा.देशमुख**, पुणेदूरध्वनी - (०२०)२४५३८४२६

## अभिनंदन !

आपल्या स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनचे सभासद श्री.अच्युत वासुदेव मंत्री यांची नात चि.श्रुती श्रीनिवास मंत्री हिने बारावीच्या (कॉमर्स) परिक्षेत ९१% मार्कस् मिळवून दैदिप्यमान यश संपादित केले. या सुयशाबद्दल असोसिएशनतर्फे तिचे मन:पूर्वक अभिनंदन !

**- सेक्रेटरी**

## संवाद लेख स्पर्धा २०१०
## पुरुष विभाग- प्रथम पारितोषिक विजेता लेख
## 'या सुखांनो या'

सर्व प्रकारची सुखे आपणास प्राप्त व्हावीत, अशी प्रत्येक व्यक्तीची इच्छा असते. सर्व प्रथम अन्न, वस्त्र, निवारा ह्या अगदी प्राथमिक गरजा अतिशय चांगल्या प्रकारे पूर्णत्वास जाव्यात, ही कल्पनाही वावगी नाही. परंतु त्यांच्या प्राप्तीसाठी करावे लागणारे प्रयत्न हे आपल्या धर्मशास्त्रातील निकषांना अनुसरून असणे हे फार महत्त्वाचे आहे. याचाच अर्थ सत्-बुद्धीची विवेक ज्योत प्रज्वलित करून ती अखंड जागविणे हेच आपले शास्त्र आपणास सांगते.

माणसांच्या इच्छा- आकांक्षा सारख्या वाढतच असतात. आपली पत्नी, मुले, नातवंड हे ही अगदी गोंडस, हुशार, सुविद्य आणि सालस व कर्तव्यदक्ष असावेत. त्यांनी आपल्या घराण्याचा नावलौकिक वाढवावा वगैरे, वगैरे. कारण प्रत्येक व्यक्तीच्या इच्छांचा पसारा वाढताच असतो, त्या सहसा संपत नसतात.

आपल्या सर्वांना असे वाटते की, आपण आपल्या कामनांच्या पूर्तीला सुख तर अपूर्तीला दु:ख म्हणतो. सुखाच्या कल्पना भिन्न असल्यातरी कोणत्याही सुखाचा अभाव म्हणजे दु:ख आणि सुखाचा अभाव असणारी घटना म्हणजे संकट होय. सुखाचे खरे रहस्य काय आहे हे प्रथम समजून घ्यायला हवे. संकटांच्या प्रसंगांमध्ये मनाची आत्मनिर्भरता हरविणे हेच मोठे दु:ख होय आणि अशा संकटांचे कितीही डोंगर उभे राहिले तरी आत्मनिर्भरता कायम ठेवणे हेच सर्वात मोठे सुख होय.

ह्या संदर्भात संतश्रेष्ठ श्री तुकारामांचा एक अभंग आठवतो, तो किती समर्पक आहे ते बघा.

''सुख पाहता जवा पाडे, दु:ख पर्वता येवढें''

याचा अर्थ डोंगराएवढे दु:ख नाहिसे करण्यासाठी डोंगराएवढे सुख लागत नाही, जसे घरात अंधार असताना लहानशी दिव्याची ज्योतही त्या अंधाराला घालवू शकते. त्यासाठी घरभर ज्योतीची जरूरी नसते. तसेच पर्वताएवढे दु:ख पचवायला जवा येवढे सुख पुरेसे होते.

आपल्या सुखाच्या कल्पना फारच वेगवेगळ्या आणि विचित्र असतात. आपली सुख-दु:खाची, मान-अपमानाची, जय-पराजयाची, श्रेष्ठत्व-क्षुद्रतेची परिवर्तने केवळ अहंकाराला कवटाळून बसण्याने होतात. अहंकारातूनच सगळ्या भावना निर्माण होतात. अहंकार फुलला की सकारात्मक आणि दुखावला की नकारात्मक भावना निर्माण होतात.

आपले सारे विश्व एका अहंकाराच्या बळावर उभे आहे. म्हणूनच आपला सारा व्यवहार 'मी' आणि 'माझे' या दोनच गोष्टींपुढे फिरत असतो. 'मी' हा अहंकार तर माझे मध्ये उर्वरीत जग सामावले आहे. त्यामुळे 'मी' चा मनाने, बुद्धीने त्याग झाल्यावर आपोआपच माझेचा शरीराने त्याग होतो.

एक गोष्ट निश्चित की आपल्याला जर अपार शांती मिळवावयाची असेल तर मी पणाच्या आणि माझे पणाच्या सर्व वृत्तींचा संपूर्ण त्याग करावयास हवा. त्याची आठवणही न राहणे हाच खरा त्याग, संन्यास होय.

हीच गोष्ट ज्ञानेश्वर माऊली आपणा सांगते -

''आणि मी माझे ऐसी आठवण ।
विसरले जयाचे अंत:करण ।
पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ।।

खरे पाहता भोगासक्त जीवन सोडायलाच पाहिजे कारण भोगात क्षणिक सुख असते पण त्यागात नेहमीसाठी अनंत सुखाची प्राप्ती होत असते. भोगाने शांती मिळत नसते. त्यागाने शांती मिळते.

प्रत्येक माणसाच्या जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे त्याचे वैवाहिक जीवन असते आणि ते सुखी असावे असे प्रत्येकाला वाटत असते. परंतु नुसती इच्छा करून संसार सुखाचा होणे शक्यच नाही. कारण संसार सुखाचा होत नाही. तर तो सुखाचा करायचा असतो. संसार करीत असताना माणसाने सदैव सावध असले पाहिजे. सावध तो सुखी हे महत्त्वाचे तत्त्व आहे. जीवनात निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देण्यासाठी हुशारी पाहिजे. सवात महत्त्वाचे म्हणजे तुटेपर्यंत न ताणता तडजोड वृत्ती स्वीकारून वाट काढीत काढीत वाटचाल करणे आवश्यक असते. यालाच शहाणपण असे म्हणतात.

दुसऱ्याच्या अनुभवावरून जो शिकतो तो खरा शहाणा असतो. ज्याच्याजवळ शहाणपण नाही त्याला प्रत्यक्ष परमेश्वरही सुखी करू शकत नाही. जेथे शहाणपण असते तेथेच सुख, शांती, समाधान, यश, समृद्धी वास करतात.

दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, संसारात स्त्री आणि पुरुष असे दोन घटक आहेत. दोन्ही घटक महत्त्वाचे आहेत हे दोघांनीही विसरून चालणार नाही. कारण ही संसार रथाची दोन चाके आहेत. दोघांमध्ये शहाणपण असेल तरच त्यांचा संसार सुखाचा होईल. शहाणपणाच्या अभावामुळे संसार सुखाचा होत नसतो. त्यामुळे दोघेही एकमेकांचे उणे-दुणे काढीत अनेक आपत्तींना, संकटांना, दु:खांना आमंत्रण देत राहतील. आजारपण मागे लागेल त्यामुळे डॉक्टरांची बीले वाढतील आणि अशा स्थितीत त्यांना मन:स्वास्थ्य तर मिळणार नाहीच पण मन:स्ताप मात्र होईल.

खऱ्या सुखाच्या प्राप्तीसाठी श्री समर्थ रामदास स्वामी काय सांगतात ते पहा :-

या सांसारिक जगतात वस्तू आणि व्यक्ती यांच्याद्वारे माणूस कधीही सुखी होऊ शकणार नाही. प्रपंचात राहून जो भगवंताशी

जोडलेला असतो आणि भगवंताला साक्षी ठेवून जो उचित प्रमाणात विषय सेवन करीत असतो, तो माणूस खरा मुक्त होय.

प्रपंचाचा खरा अर्थ काय हो ? तर आपल्या वाटेला आलेले विहित कर्म आपण मनापासून केले पाहिजे. कर्तव्य कर्माची हेळसांड करू नये. आपला व्यवसाय किंवा नोकरी आनंदाने करण्यातच खरे शहाणपण आहे. जीवनात जर राम-नाम नसेल, तर जगण्यातच राम नाही ते जीणे व्यर्थ होय. किंबहुना ते जीवन म्हणजे विषय विषाने भरलेला नरकच होय. कारण विषय सुखाच्या पलिकडे अत्यंत श्रेष्ठ असा प्रेमानंद आहे, याची कल्पनाच अशा माणसांना नसते.

विषयासक्त मन जीवाला सांसारिक संकटात फसवित असते आणि तेच मन विषय रहित झाले तर जीवाला शांतीमय मोक्षाची प्राप्ती करून देणारे ठरते.

खऱ्या सुखाच्या प्राप्तीसाठी आत्मज्ञान होणे अतिशय आवश्यक आहे. आत्मज्ञान हा एक विलक्षण अनुभव आहे, अनुभुती आहे. आत्मज्ञान हे मनुष्याचे जीवन बदलून टाकीत असते. आयुष्यात अनुभवाला येणारी नाना दु:खे भयंकर स्पर्धा, तगमग, तडफड हे सारे आपल्या स्वरूपाच्या अज्ञानामुळेच होत असते. 'मी' माझे च्या निरवालस भ्रामक समजुतीच त्या सर्वांचे एकमेव कारण होय.

खरा आनंद आणि समाधान हे आपल्या आतच आहे. आपले स्वरूपच मुळी सत्-चित-आनंद असे आहे आणि म्हणूनच आत्मज्ञान होण्याची, करून घेण्याची फार जरूरी असते. आपल्या पंचकोषात्मक देहातील पाचव्या आनंदमय कोषात आपला आत्मा (चैतन्य) वास्तव्यास असतो. परंतु तो अज्ञानाच्या वलयाने आच्छादलेला असून बाकीच्या चार कोषांनी झाकलेला असतो. अज्ञान दूर केल्यावर आनंदाची प्राप्ती होते. वृत्ती अंतर्मुख होऊन स्वरूपामध्ये लीन होतात. त्यामुळे देहबुद्धी क्षीण होऊन तिची जागा आत्मबुद्धी घेते आणि 'मी' देहापूरता न राहता सर्वव्यापी बनतो. बुद्धीला एक ज्ञान शक्ती 'प्रतिभा' प्राप्त होते.

परमेश्वरावर श्रद्धा असावयास हवी कारण श्रद्धा जोपासण्याने मन शांत होईल. शांत मनाने बुद्धी काम करेल. बुद्धी मनावर ताबा ठेवेल. त्यामुळे योग्य निर्णय घेतले जातील. शुचित मनाने शरीर प्रकृती चांगली राहील. श्रद्धा ही सत्याच्या बैठकीवर आधारलेली असते. स्वत:च्या अनुभूतीवर विश्वास ही श्रद्धा तर अनुभूती न घेता ठेवलेला विश्वास ही अंधश्रद्धा होय.

आपली आसक्ति घालविण्यासाठी आपण मनाने वानप्रस्थाश्रम स्वीकारू शकतो. हळूहळू आपण स्वत:ला जबाबदाऱ्यातून मुक्त करायला सुरूवात करायची. आपली मुलं आता मुलं न राहता मोठी माणसं झाली आहेत; हे लक्षात घेऊन आपण आपल्या मनाच्या वनात प्रवेश केला, तर दगडमातीच्या घरात राहूनही आपण वानप्रस्थी राहू शकतो, त्यासाठी घर सोडून जाण्याची काही गरज नाही.

निष्काम भक्तीच भगवंताला प्रसन्न करते. तुम्ही सर्वस्व देवाला अर्पण करा म्हणजे देवही आपले सर्वस्व तुम्हाला देईल. निष्काम भक्तीच सर्वश्रेष्ठ आहे. सवय आणि गरज यावर नियंत्रण ठेवले तर मनुष्य भगवंतात लीन होऊ शकतो.

प्रत्येकजण आपापल्या ईच्छा-वासना, संस्कार यांच्या अनुरूप आपोआप कर्म करीत असतो. पण हेच कर्म अनासक्तपणे, ईश्वरार्पण बुद्धीने, स्वार्थरहित होऊन करण्याचा प्रयत्न केल्यास ते उन्नतीकर ठरते. अशा कर्मालाच भगवत्-गीतेत बुद्धीयोग म्हटले आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपली धर्मावर श्रद्धा असावी. धर्म याचा अर्थ समाज एकत्र राहण्यासाठी पाळावयाची शाश्वत मुळ्ये होय. ती म्हणजे अहिंसा, सत्य, चोरी न करणे, पावित्र्य, साधी राहणी, नैतिकता आकरण साठा न करणे, अभ्यासू वृत्ती व ईश्वराच्या सान्निध्यात राहणे या मूल्यांमागे सामाजिक स्थैर्याचा विचार आहे, फक्त आपल्याच सुखाचा विचार न करता इतरांच्या गरजांची जाणीव ठेवण्याचा प्रयत्न आहे.

अशा प्रकारे आपण आपला जीवनक्रम आखून परमेश्वराच्या सान्निध्यात राहिलो तर 'या सुखांनो या' असे सुखांना न बोलवीताच आपण अत्युतम सुखाची प्राप्ती करू, यात शंकाच नाही.

- **श्रीपाद जोशी**, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०३६७४१२

# अभिनंदन !

आपले सभासद श्री.अशोक द.परब, अंधेरी (प.) यांनी सभासदांसाठी काहीतरी करावे या हेतूने मुंबई येथील Y.M.C.A. या संस्थेच्या शाळेत इंग्रजी, गणित या विषयांचे कोचिंग सुरू केले आहे. त्यांचे असोसिएशनतर्फे अभिनंदन!

समाजसेवेची आवड असलेल्या सभासदांना मार्गदर्शन करण्यासाठी वा कोणती समाजसेवा करावी यासाठी पुढील दोन संस्था मदत करतात.

१) SOSVA मुंबई, खोली नं. २ व ३, पेटीट म्युनिसिपल स्कूल, भाभा हॉस्पिटल समोर, आर.के माटकर मार्ग, वांद्रे (प.) मुंबई ५०, फोन - २६४११२०५/२६५५५७०४

२) SOSVA पुणे म्हाडा कमर्शिअल कॉम्पलेक्स, एम. एच.बी.कॉलनी, येरवडा, पुणे ४११ ००६.

- सेक्रेटरी

# संवाद लेख स्पर्धा २०१०
## स्त्री विभाग- प्रथम पारितोषिक विजेता लेख
## 'या सुखांनो या'

मनुष्य प्राण्याचे इतर प्राण्यांहून वेगळेपण सांगताना एक गोष्ट नेहमी सांगितली जाते ती म्हणजे माणूस हाच एकमेव हसणारा प्राणी आहे. पण मला माणसाचे आणखी एक वेगळेपण जाणवते ते म्हणजे इतर प्राण्यांचे आयुष्य जास्त करून अन्नाच्याच शोधामागे जाते. किंबहुना अन्नाचा शोध हेच त्याचे आयुष्य किंवा ध्येय असते. पण माणूस हा प्राणी त्याच्या उत्क्रांत अवस्थेमुळे म्हणा किंवा अन्नाचा त्याचा शोध संपल्यामुळे म्हणा आणखी एका गोष्टीचा शोध आयुष्यभर घेत असतो आणि ती गोष्ट म्हणजे सुख.

खरंच सुख म्हणजे नक्की काय ? अध्यात्मामधल्या शेवटच्या प्रश्नाप्रमाणे 'मी कोण' किंवा 'मी इथे का आलो' अशा गहन प्रश्नाप्रमाणेच सुख म्हणजे नक्की काय हा पण विचार करण्यासारखाच प्रश्न आहे. तसे पाहिले तर प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे आपली सुखाची व्याख्या ठरवितो आणि त्यामागे धावतो. पण सुख ह्या कल्पनेचा ल.सा.वि. काढता येईल का ? आपल्या सर्वांच्या लाडक्या पुलंनी तर त्यांच्या ''माझे खाद्यजीवन' ह्या लेखात मध्यम वर्गाची सुखाची रेडीमेड व्याख्याच दिली आहे. ती मुळातूनच वाचण्यासारखी आहे.

आपण लहानपणापासून त्या त्या वयात वेगवेगळी ध्येय ठरवितो, त्यांच्या पूर्तीसाठी प्रयत्न करतो, जेव्हा ती साध्य होतात तेव्हा हरखून जातो व जेव्हा ती पूर्ण होत नाहीत तेव्हा मन नाराज होतं. पण ते सर्व आता लुटूपुटूचे वाटते, लहानपणाच्या भातुकलीच्या खेळासारखे वाटते. पण जेव्हा आयुष्याच्या रंगमंचावर खराखुरा भातुकलीचा खेळ सुरू होतो, तेव्हा मात्र सर्व परिमाणे बदलतात, व्याख्या बदलतात. तो भातुकलीचा खेळ न वाटता प्रयत्नांचा आणि नशिबाचा लपंडाव वाटायला लागतो आणि जेव्हा नशीब, प्रारब्ध वगैरे कल्पना मनात घर करतात तेव्हा सुख ह्या कल्पनेचे अगणित पैलू दिसायला लागतात आणि सुख ही कल्पनाच मनाचा एक खेळ वाटायला लागते.

''सुख पाहता जवापाडे, दु:ख पर्वताएवढे'' किंवा ''एक धागा सुखाचा शंभर धागे दु:खाचे'' इ. गोष्टी कळत्या न कळत्या वयापासूनच कानावर पडलेल्या असतात त्यामुळे सुख ही अत्यंत दुर्मिळ व क्षणभंगुर गोष्ट आहे हे पण कुठेतरी मनावर बिंबलेले असते.

प्रसिद्ध लेखक दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' ह्या सुंदर पुस्तकात एक वाक्य आहे. असे अनेक स्वभावी देव असणे हे माणसांच्या विविध स्वभावांना धरूनच आहे. त्यामुळे आपापल्यसा प्रकृतीप्रमाणे देव निवडून आपणाला मोकळ्या मनाने त्या सर्वसाक्षी परमेश्वरापर्यंत जाता येते.'' जे देवाबद्दल तेच मला वाटत्रे सुखाबद्दलही म्हणता येईल की आपापल्या विविध स्वभावानुसार आपल्याला आपली सुखाची व्याख्या करून त्याला आपल्या आयुष्याचा एक भाग करता येईल. कोणाच्या दृष्टीने सुख म्हणजे भौतिक सुखाच्या गोष्टी गोळा करणे. पण मला वाटतं ते अधिकाचा हव्यास निर्माण करणार आहे. त्यामुळे ते माझ्या सुखाच्या व्याखेत बसणारे नाही. तर त्या उलट शाश्वत सुख म्हणजे कदाचित ईश्वराचा, अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी सर्वसंगपरित्याग करून हिमालयात वगैरे जाऊन तप करणं असेल. अर्थात हे विचार कितीही थोर असले तरी हे शिवधनुष्य माझ्यासारख्या संसारात रममाण झालेल्या व्यक्तीला पेलवणारे नाही.

आज वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि सर्वसाधारण जागरूकतेमुळे माणसाचे फक्त आयुष्यमानच वाढलेले नाही तर त्याच्या शरीराची व मनाची उपभोगक्षमता पण वाढली आहे. आज माणूस सेवानिवृत्त झाल्यावर पण आता पुढे काय करणार म्हणून सहज प्रश्न विचारला जातो. म्हणजेच 'दात आहेत आणि चणेही आहेत' असाही एक योग जुळून यायला लागला आहे. पूर्वी चाळीशी पन्नाशीचे टप्पे ओलांडले तेव्हा मनाची समजूत काढण्यासाठी Life Begins at 40, 50 वगैरे पुस्तके वाचली पण आता वाटायला लागले आहे की Life Begins at any age आपल्या आयुष्याच्या पायवाटेवर पावला पावलावर सुख उभं असतं वेगवेगळ्या रूपात. गरज आहे फक्त त्याला ओळखून दोन्ही हात पसरून आपल्या मिठीत घेण्याची हवी आहे वृत्ती. आयुष्याचा रसरसून अनुभव घेण्याची. 'तुझे आहे तुजपाशी' मधल्या काकाजीसारखी दाद देण्याची किंवा दाद देण्याच्या जागा शोधण्याची.

श्री.जी.ए.कुलकर्णी यांचा एक अतिशय सुंदर ललित निबंध आहे. 'कधीतरी' नावाचा. त्या निबंधात त्यांनी धकाधकीच्या आयुष्यात राहून गेलेल्या गोष्टींची आणि बघू नंतर कधीतरी म्हणून बाजूला टाकलेल्या स्वप्नांची यादीच दिली आहे. त्या गोष्टी अगदी प्रातिनिधिक स्वरूपाच्या. अगदी तुमच्या आमच्या मनातल्या आहेत. मला वाटते आता हेच वय आहे त्या राहून गेलेल्या स्वप्नांची पूर्तता करण्याचे. ह्या सुखाच्या शोधाचा जी.ए. आणखी एक कानमंत्र देतात. ''जोपर्यंत स्मृती आहे तोपर्यंत सारा वर्तमानच आहे. त्यांना भूतकाळाची छायाच नाही.''

आपल्या वाट्याला आलेले हे आयुष्य आपल्याला एकदाच जगायचे आहे. जगन्नियंत्याने किंवा नियतीने किंवा पूर्वसंचिताने हे दान माझ्या पदरात टाकले आहे. अशी काही गृहीतके आपण एकदा मान्य केली की आयुष्याचा मोठेपणाही कळतो आणि फोलपणाही. आणि मुख्य म्हणजे प्रत्येक क्षण आनंदाने व्यतीत

करण्याचे महत्त्वही पटते. किंबहुना छोट्या छोट्या गोष्टीत आनंद, सुख दिसायला लागते. मग बाल्कनीतल्या कुंडीतल्या मोगऱ्याच्या फांदीला येणाऱ्या कळीची चाहूल देखील पुढील आठवडाभर सकाळी अनावर हुरहुरीचा आनंद देवून जाते किंवा निशिगंधाची फांदी पोटुशी असल्याचा आनंद मैत्रिणींना अगदी पुण्याला माझ्या सासूबाई व सूनबाईलासुद्धा फोनवरून सांगून द्विगुणीत केला जातो.

हल्ली दिवसातून वेगवेगळ्या वेळी होणाऱ्या लोडशेडींगमुळे स्वत:शीच संवाद साधायला थोडावेळ मिळायला लागला आहे. रेडिओ बंद असतो, टि.व्ही.बंद असतो. विशेषत: संध्याकाळची ७ ते ८.३० ची लोडशेडिंगची वेळ माझी खास आवडती आहे. घरात Inverter असला तरी मी दिवे बंद ठेवते आणि बाल्कनीतल्या झुल्यावर बसून आठवणींचा अल्बम उघडते. मग बालपणीची ती आमच्या गावची, शिरवळची नीरा नदी, M.Sc. करत असताना Botany च्या Specimens गोळ्या करण्यासाठी केलेल्या जंगलातील सहली, अमृतसरची ऐन डिसेंबरमधील जीवघेणी थंडी, बद्रीनाथ-केदारनाथचे गूढ निळे पारदर्शक आकाश, घोड्यावरून जाताना पाहिलेला तो अद्‌भूत सुर्योदय, हिमालयाची सोनेरी शिखरे इ. गोष्टी आठवतात. कन्याकुमारीचा सूर्यास्त, गोव्याचे समुद्रकिनारे, हरिहरेश्वरची समुद्रातून केलेली प्रदक्षिणा ह्या अशा सगळ्या आठवणी एका अनामिक सुखाने मन भारून टाकतात व ते क्षण परत जगल्याची अनुभूती देतात. एवढंच कशाला देवानंदच्या एखाद्या जुन्या कृष्ण-धवल चित्रपटातील उडत्या चालीचे गाणेदेखील मनाला खूप तरूण करून जातात.

आता इतक्या वर्षानंतर एक गोष्ट नक्की कळून चुकली आहे की आपल्याला आस्वादकाचीच भूमिका जगता येईल. देव जेव्हा १४ विद्या, ६४ कला वाटत होता तेव्हा बहुधा रांगेत माझा ७९ वा नंबर होता. पण त्याबद्दल खंत तर नाहीच उलट देवाचे आभार मानते कारण त्यांनी मला माझ्या अनुभूतीच्या विकासाची, विस्ताराची, आवडीनिवडीची आणि मुख्य म्हणजे सगळ्यांबद्दल कुतूहल जागृत ठेवून परत विद्यार्थी होण्याची सोय करून ठेवली आहे. मी सुद्धा नोकरीत असताना आवड असून वेळ नाही म्हणून बाजूला ठेवलेल्या गोष्टींकडे आता परत वळायला सुरूवात केली आहे. भले फार काही कळो न कळो पण शास्त्रीय संगीतातले राग ऐकून निदान दोन रागातला फरक तरी कळतोय का ते पहाणे. आता स्वत:च्या भविष्याबद्दलची उत्सुकता संपल्यावर ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्रात डोकावणे आपल्या पूर्वजांनी केवळ निरीक्षणातून उभा केलेला हा पसारा आणि केवळ कल्पना शक्तीतून त्याभोवती बांधलेले आडाखे मनाला थक्क करतात. तसेच आमच्या घरात असलेल्या विविध विषयांवरच्या ५००-६०० पुस्सतकांची सूची तयार करणे. एखाद्या दिवशी सूची करता करता एखाद्या पुस्तकात आजूबाजूच्या सर्व गोष्टींचा विसर पडून बुडून जाणं, आणि ते रामायण, महाभारत ज्ञानेश्वरी नावाचे तीन पर्वत इच्छा आहे पण अजून तरी त्यांच्या पायथ्यावर माथा टेकविण्याचे धैर्य झालेले नाही.

मला वाटतं खरं सुख हे फुलपाखरासारखे असते. त्याच्यामागे धावलं तर ते हुलकावण्या देतं, चिमटीत येत नाही. अगदी आलेच तरी त्याच्या पंखावरचे रंग आपल्या बोटांना लागतात आणि बेरंग होतो, विरस होतो. पण जर त्याच्याकडे दुर्लक्ष केलं तर ते नकळत तुमच्या खांद्यावर शांतपणे पंखांची उघडझाप करत येऊन बसते. सध्या माझ्या खांद्यावर एक सुंदर फुलपाखरू येऊन बसलेले आहे आणि ते फक्त तिथून उडू न देण्याची माझी खटपट चाललेली आहे.

**- सौ.कल्पना मोहन गोखले**, डोंबिवली (पूर्व),
दूरध्वनी : (०२५१) २८६३०२४

# अभिनंदन !

अहमदनगरच्या 'अजिक्य ॲडव्हेंचर' ग्रुपच्या युवकांनी नुकतीच जुन्नर नाणेघाट परिसरातील ३८५ फूट उंच असलेला 'वानरलिंगी' सुळक्यावर यशस्वी चढाई केली.

या चार तरुणांच्या ग्रुप मध्ये आपले सभासद श्री.बी.के. कुलकर्णी यांचा मुलगा जयंत कुलकर्णी व श्री.के एच. बलदोटा यांचा मुलगा केतन बलदोटा हे दोन युवक सहभागी झाले होते. नगर शहरात या साहसी युवकांचे कौतुक होत आहे.

या साहसी युवकांची मुलाखत अहमदनगर आकाशवाणी केंद्रावरून दि.२९-४-२०१० रोजी रात्री ८.१५ प्रसारित करण्यात आली. असोसिएशनतर्फे दोन्हीही साहसी युवकांचे अभिनंदन !

- सेक्रेटरी

# अभिनंदन !

आपल्या स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशचे सभासद श्री.अच्युत वासुदेव मंत्री यांची स्नुषा डॉ.सौ.स्वाती श्रीनिवास मंत्री ह्या महाराष्ट्र ज्योतिष परिषदेने घेतलेल्या ज्योतिष शास्त्री परिक्षेत ७६% गुण मिळवून विशेष श्रेणीने उत्तीर्ण झाल्या. तसेच ज्योतिष गणित या विषयात महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल असोसिएशनतर्फे त्यांचे अभिनंदन!

- सेक्रेटरी

# महिला आरक्षण आणि मी

'देव देतो आणि कर्म नेते' अशी एक म्हण आहे आणि प्रत्यक्षात कर्म देते आणि सरकार नेते असा अनुभव आहे. दिल्लीला गदारोळ घालत महिला आरक्षण बील अर्धे वसूल झाले आणि अर्धे लटकले त्याच सायंकाळी आमच्या घरी मंडळींनी घराचे पुढील दिवाणखान्यातील तेहतीस टक्के जागा त्यांचे महिला मंडळातील विविध गुण दर्शनाचे सरावासाठी रिझर्व्ह ठेवावी असे सांगितले. घरामध्ये इनमीन चार माणसे, अधिक पाच खोल्या आणि मागे पुढे व्हरांडा - नोकरीवर होतो तेव्हा सर्व वास्तुवर व वस्तूंवर माझा अधिकार होता परंतु सेवानिवृत्तीनंतर अरब आणि उंट या गोष्टीप्रमाणे उंटाचे प्रगतीमुळे आमचे वास्तव्य म्हणजे आक्रमण वाटू लागले. ऑफिसात व घरात माझे पुढे येऊन समक्ष उभे राहण्याची किंवा बोलण्याची कोणाचीच ताकद नव्हती. मी करीन ती पूर्व दिशा. मग इतर माणसे पाळीव प्राण्यांप्रमाणे जीव मुठीत धरून होती. पुढे पेशवाई गेली आणि इंग्रजांचे राज्य आले वगैरे वगैरे. पुढे स्वातंत्र्यासाठी बलिदान, संघर्ष, सत्याग्रह, पक्ष बांधणी, पक्षांतर, निवडणुका, मतदान, आमदार, खासदार आणि रोजीरोटीसाठी राबराबणारे नोकरदार काही फरक पडला का ? आचार विचारांची देवाण-घेवाण शेजारील देशाशी सहकार्य मैत्रीचे करार, एक भाषा, एक पोषाख पडेल ते काम आणि मिळेल ते दाम सुजलाम सुफलाम क्षणभर डोळे मिटून घेतले की डोळ्यांसमोर सप्तरंगी चित्र उभे राहत असे आणि आता प्रत्यक्षात डोळे मिटण्याची वेळ आली तरी हे मिळेल का ? ते मिळेल का? 'हे मिळाले नाही - ते मिळाले नाही अशी खंत मनामधे खदखदच आहे.

प्रथम प्रथम विनवण्या - मग मागण्या नंतर घोषणा व निदर्शने बेशिस्तीची प्रदर्शने कामामध्ये दिरंगाई असहकार आणि शेवटी कोर्टकचेरी व निकालाची वाट पाहता पाहता साठी शांती, अमृत महोत्सवी सहस्र चंद्रदर्शन होईल - पण कोर्टाचा निकाल लागणार नाही. बाकी आपले सरकार फार कृपाळू, दयाळू आणि मायाळू आहे. आपण पेन्शन वाढीसाठी प्रयत्न करीत आहोत. तर सरकार महागाई वाढ होत आहे म्हणून महागाई भत्ता वाढवीत आहे. काय चुकले ? पूर्वी पगार मिळत होता त्याचेपेक्षा दुप्पट, चौपट पेन्शन मिळत आहे. तेव्हा उगाच पेन्शन वाढीचा प्रश्न तडीस नेण्यासाठी टेन्शन कशाला वाढविता ? आता तुम्ही जितके जास्त जगाल तेवढी महागाई वाढेल आणि तेवढे पेन्शन पण वाढेल व या स्पर्धेमध्ये शेवटी तुम्हाला मूळ पेन्शन नव्या आयोगाप्रमाणे) शंभराव्या वर्षी दुप्पट व त्यावर चौपट महागाई मिळेल, पुरे झाले, पण याचा उपभोग घेण्यासाठी शरीर साथ देईल का - हा प्रश्न मुख्य आहे. इकडे दोन लाखात भागत नव्हते म्हणून मेडिकल बेनीफिट मर्यादापण सात लाखापर्यंत वाढवली आहे. यामुळे शंभरी गाठण्यास काहीच हरकत नाही. मग दंताजीचे ठाणे उठले तर 'मिक्सर' मधून खा. दृष्टी अंधूक झाली तर स्वप्ननगरीत पर्यटनाला जा आणि गुडघ्यांची शस्त्रक्रिया करून घेतली तर कुबड्या घेऊन उड्या मारा पण संघर्ष सोडू नका. माझ्या डोक्यात हे विचारांचे युद्ध चालू होते आणि सौभाग्यवतीने मी 'बीपी' ची गोळी घेतली का म्हणून विचारणा केली. मी चुकून डायबेटीसची गोळी घेतली म्हणून सांगितले तर खूप चिडल्या आणि ॲसिडीटीची गोळी घेतल्याशिवाय ती गोळी कशाला घेतली म्हणून अेके फॉर्टीसेव्हन हातात घेतली. माझी इतकी काळजी घेतात तर मग हे महिला आरक्षण काय प्रकरण आहे ? का सदुषष्ट टक्के रक्षण आणि तेहतीस टक्के आरक्षण याचे हे बील आहे? आणि सध्याचे दवाखान्याचे बील लाखात असते त्यापेक्षा 'महिला रक्षणाचे ' बील लाखमोलाचे आहे हे लक्षात आले आणि मी माझा दिवाणखाना संपूर्ण मोकळा करून दिला आता येथे सकाळी हास्यक्लब भरवा नंतर योग प्राणायम करा नंतर चर्चा दुपारी पाककला, भजन, भिशी, कपड्यांचे सेल, आरोग्य, चाळीशी नंतरचे आजार, स्त्रियांवरचे अत्याचार अशा अनेक बाबींवर ऊहापोह मधूनमधून कांदापोहे खा. पण शेवटपर्यंत तुम्ही खुटखुटीत रहा व मला सांभाळा. बीलाला विरोध करणारे बहुतेक सर्वजण ब्रह्मचारी असतील असा विचार केला आणि शेवटी दिवाणखानाच दान केला.

दुसरे दिवशी सर्व कामे बाजूला ठेवली आणि 'संवाद' मासिकावरील माझा पत्ता बदलण्यासाठी पेन्शनर्स असोसिएशनला पत्र टाकले. तुम्ही पण आता माझा पत्ता घालताना प्रथम माझे नाव घाला नंतर केअर ऑफ मिसेसचे नाव घाला. नंतर फ्लॅट नंबर खोडून दिवाणखाना कोपरा नंबर, एक, दोन, तीन, चार काय असेल तो अथवा मागील गॅलरी पुढील गॅलरी गच्ची, गॅरेज, कार पार्कींग एरिया वगैरे स्पष्ट लिहा आणि दुर्दैवाने त्या आधीच साथ सोडून गेल्या असतील तर केअर ऑफ वृद्धाश्रम वॉर्ड ए, ब्रह्मचारी विभाग, वॉर्ड बी, विवाहित पण घटस्फाटित विभाग वॉर्ड सी, विवाहित पण अपत्य नसलेला व विभाग वॉर्ड डी विवाहित अपत्य असलेले पण मुलेमुली विचारीत नसलेला विभाग असे जरूर लिहा. म्हणजे संवाद गहाळ होणार नाही. बाकी संवाद मासिक मिळाले नाही तर लगेच मी तक्रार करतो पण ते वेळेवर आले तर मी वाचतोच असे पण नाही. कारण माझ्या आयुष्यातील प्रत्येक क्षण रक्षण आरक्षण यात गुंफलेला आहे त्याचा शिक्षणाशी काहीच संबंध नाही.

**- मधुकर दिगंबर पालकर**, पुणे
दूरध्वनी - ०२०/२४४७१७६६

# प्रतिक्रिया

'संवाद' फेब्रुवारी २०१० चा अंक प्राप्त झाला. उत्सुकतेने सर्व लेख-चुटके व इतर सर्व माहिती वाचून काढली. 'संवाद'चे बाबतीत माझ्या प्रतिक्रिया बरेच वेळा प्रसिद्ध झाल्यात त्याबद्दल मी आभारी आहे. ह्या अंकातील 'आयुष्यवर बोलू काही' हा लेख दोनदा वाचला व त्याने मला प्रतिक्रिया देण्यास प्रवृत्त केले म्हणा प्रेरणा जागी केली म्हणा.

ह्या लेखात इतक्या निरनिराळ्या तऱ्हेने हिंदी-मराठी-उर्दू-इंग्रजी उदाहरणे देवून लेख ज्या तऱ्हेने मढविला व पेश केला ह्याला तोड नाही. श्री.करमरकर अभिनंदनास पात्र आहेत. इतरही लेख, चुटके, कविता वाचून मन काही प्रमाणात का होईना रमते व वेळही चांगला जातो.

शेवटी संवादच्या संपादक मंडळाला त्यांनी चालविलेल्या ह्या उपक्रमाबद्दल माझ्या हार्दिक शुभेच्छा.

- आप्पा कुलकर्णी, सांताक्रूझ पूर्व

* * * * * *

मे २०१० चा 'संवाद' चा अग्रलेख शरद शिंगवेकर यांचा फार छान. सकारात्मक विचारांची मालिका आयुष्य सुखकर करते हे उदाहरणे देऊन पटवलं आहे.

करमत नसेल तर कार्यरत रहा. हे वाक्य लक्षात ठेऊन आपण अपल्यापरी स्वत:ला चांगल्या कामात गुंतवून घेणं श्रेयस्कर!

**- मंगला नातू**

# अभिनंदन !

आपले एक सभासद श्री.शरद पांडे (गुणवंत कामगार) आकोट यांची शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. यापूर्वी त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. श्री.शरद पांडे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक आहेत त्याचप्रमाणे अखिल भारतीय ग्राहक पंचायत अकोल जिल्ह्याचे कार्यकारीणी सदस्य आहेत. त्याच बरोबर ते श्रीराम मंदिर शनवारापुरा जिर्णोद्धार बांधकाम समितीचे ही सदस्य आहेत. वनवासी कल्याण आश्रम मध्ये देखील उपाध्यक्ष म्हणून काम पहात आहेत. सेवा निवृत्ती नंतर देखील त्यांचे आकोट नगरामध्ये विविध क्षेत्रात सामाजिक कार्य सुरू आहे. असोसिएशनतर्फे त्यांचे अभिनंदन!

- सेक्रेटरी

# आभार

**मा**हिती ठेवून आठवणीने वाढदिवसाची आमच्या
**काय** म्हणता, पाठवले पत्र, नव्हे शुभेच्छांचा डोंगरच तो
**बा**की काय उरते, एकमेकांना दिलेलं प्रेमच ना
**पर**ंतु प्रेमाचा हा स्मृतीसुगंध दरवळत राहतो वर्षभर
**ट**रफलासारखे उडून जाते सर्वकाही,प्रेमाच्या स्मृती सुगंधाशिवाय
**मी** तर खूपच सुखावून जातो ह्या आठवणींनी
**आ**पले शुभेच्छापत्र वाढदिवसाला दरवर्षी पाहतो तेव्हा
**प**टापट पाकीट उघडून आतुरतेने वाचतो मजकूर
**ला**घवी भाषेत सुंदर भावना व्यक्त केलेला सुंदर मजकूर
**आस** ठेवून मनी, पुन: पुढील वाढदिवसाच्या पत्राची
**भास** तर होतो वर्षभरच, दररोज आपले पत्र आल्याचा
**री**टायर्ड लाइफ हिरवे हिरवे राहते त्यामुळे
**आ**नंदी वाटतो जीवनाचा क्षण न क्षण
**हे** प्रभो, शुभेच्छापत्र पाठवणाऱ्या ह्या आनंददात्यास
दीर्घायुरारोग्य लाभू दे.

**- पी.एम.भगत,** मुंबई

## विनोद ☺

दारावरची बेल वाजली तशी मावशीबाईंनी आपली शबनम बॅग अन् पर्स खांद्यावर घेतली अन् कुलूप किल्ली हातात धरून दार उघडलं. दारात त्याची लाडकी भाची निशा उभी होती.

''हे काय ? मावशी तू कुठे बाहेर निघाली आहेस का ? जाऊन ये. मी नंतर येईन'' भाची म्हणाली. हात पकडीत तिला आत आणत मावशी म्हणाली, ''कुठ्ठे जात नाहीये गं मी - हे माझं नाटक आहे'' मावशी हसत म्हणाली.

''नाटक ?'' भाची गोंधळून मावशीकडे बघत म्हणाली. ''हे कसलं नाटक ?''

''हं नाटकच करावं लागतं असं - अगं कधी कधी नको त्यावेळी दारावरची बेल वाजली - अन् दार उघडल्यावर नको ती व्यक्ति दिसली तर तिला वाटावं की मी बाहेर निघाले आहे म्हणून असं नाटक करते. अन् नको ती व्यक्ति आपोआप कटते'' मावशी म्हणाली.

**- मधु रानडे**

# माझं गाव कोंडगाव

माझं जन्मगाव नाव त्याचे कोंडगाव
तिथे जावेसे वाटते पुन्हा पुन्हा ॥१॥

माथ्यावर सह्याद्री, पहाडी आंबाघाट
निसर्गाचा थाट, वर्णू कैसा ॥२॥

कुशीत सह्याद्रीच्या, नदी जन्मली काजळी
दौडते पावसाळी, पुन्हा नाही ॥३॥

गड विशाल पूर्वेला, पश्चिमेला मार्लेश्वर
रत्नागिरी-कोल्हापूर, दूर नाही ॥४॥

कोंडगावाच्या रक्षणा, गाव कुशीला गांगोबा
माळावर महासती, वास करी ॥५॥

वेशीवर गावच्या, विसावला ईश्वर
देव निधानेश्वर, गावाला सांभाळी ॥६॥

गावी मुक्कामी श्रीदत्त, नरसिंह आणि राम
त्यांचे सर्वामुखी नाम, सदा राहो ॥७॥

अठरापगड जाती गुण्या गोविंदे नांदती
सर्व धर्म समभाव, जपताती ॥८॥

माझे घर कोंडगावी आहे जुनाट कौलारू
तरी सुखाचा सागरू, मज भासे ॥९॥

- प्रभाकर कानिटकर, कोल्हापूर

## विनोद

बाबा : रमेश, एवढा चेहरा पाडून काय बघतोयस, बघू ? काय आहे तुझ्या हातात ?

रमेश : काही नाही, काही नाही.....

बाबा : 'बघू' (म्हणत हातातून घेतात एकदम ओरडतात) ''अरे हरामखोरा काय हे ? ७ विषयांपैकी ५ विषयात नापास असलेले लाल शाईचे मार्क शिट बघत होतास ? लाज नाही वाटत ? अभ्यास करतोस की काय करतोस ?''

रमेश : ''अहो बाबा, ते मार्कशीट माझे नाही. कपाटातल्या जुन्या अडगळीस सापडलेले 'तुमचेच' शाळेत असतानाचे जुने आहे ते !

बाबा : ठीक आहे, ठीक आहे. अभ्यास कर जा.

**- भरत जैन,** नाशिक

# आनंदाचे झरे शोधले पाहिजेत.....

रणरणत्या उन्हात
उजाड माळावर
वेडावाकडी वाट चालताना
गलबलत्या जीवा,
आनंदाचे झरे शोधले पाहिजेत....

माणसांच्या समुद्रातून
एकाकी चालताना
दिशाच हरवलेली
वाट तुडवताना,
आनंदाचे झरे शोधले पाहिजेत....

रखरखित वाळूत
भुसभुशीत पायावर
संसाराची गढी उभारताना
विफलता मागे सारून
आनंदाचे झरे शोधले पाहिजेत.....

इथे तिथे आजूबाजूला
जवळच्या रानात
दूरच्या डोंगरात
किती किती व्यर्थ शोध
आनंदाचे झरे गवसतील गवसतील
डोकावशील जर स्वत:च्याच अंतरात.....

**- प्रकाश चित्रे,**
कोल्हापूर, ९९२२६२६२००

# अभिनंदन !

आपले एक सभासद श्री.दिगंबर बापट (डि.एच.) यांचा नातू चि.अमर हा मिडल स्कूल स्कॉलरशिप परिक्षेत पुणे जिल्हा शहरी विभागात २९२/३०० मार्क मिळवून तिसराआला.

इंग्रजी विषयात १००/१०० मार्क मिळाले.

या विशेष प्राविण्याबद्दल असोसिएशनतर्फे त्याचे अभिनंदन!

- सेक्रेटरी

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

## रसिक

इथे मनाच्या उघड्या दारी, इथे तृणाच्या हिरव्या तारी
इथे कुंपणी अडकून पडले, शब्द, अर्थ अन् ओठी रूतले
रात्री येथे नभ झाकोळले, नेत्री येथे बीज अंकुरले ।
बीज तेच अन् शब्द तेचही, अंकुरल्या प्रीतिची लाही
मंद मधुर प्राजक्ताची बाही, सडा ढाळिते कुंपणावरही
तार न रुते प्राजक्ताला, गौर गालिचा तयार झाला ।
सान, सानुली बोटे उचलती, फुला, फुलांनी परडी भरती
खुलवित जाई काव्यपंक्ती, जनपाऊलाची नुरली भीती ।
कलिकेहुनि कोमल स्पर्श जाहले,
फुला, फुलाचे भाग्य उजळले
इथे मनाचे दार उघडले, इथे तणाचे, तृण हो झाले ।

**- कल्पना सुभाष कोठारे,**
सांताक्रूझ(प.)मुंबई ५४.
फोन - २६१०४५५२

## चारोळी

विचारांचा विचार केला
तरच सुचतात विचार
आणि एकदा का कागदावर उतरले
की मग होतो साक्षात्कार
****
जगण्याची इच्छा असूनसुद्धा
कोणीतरी जगणं थांबवत असतं
मरण्याची इच्छा असूनसुद्धा
कोणीतरी मरण लांबवत असतं
****
ऐकणारे आहेत म्हणूनच
ऐकवण्यात मजा असते
प्रतिसाद छान मिळाला की
आपोआप चारोळी सुचते

**- शरद महाबळ,** भ्रमणध्वनी - ९३७२४२८३२२

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.